**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## विद्यापीठाची आचार्य पदवी पूर्व परीक्षा व एम.पेट २०२१ परीक्षेबाबत सूचना
## १२ केंद्रांवर होणार परीक्षा
## संबंधितांनी नोंद घेण्याचे आवाहन

अमरावती –

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आचार्य पदवी पूर्व परीक्षा व एम.पेट २०२१ परीक्षा दि. २७ व २८ नोव्हेंबर, २०२१ रोजी १२ परीक्षा केंद्रांवर १२.०० ते १.३० व ३.०० ते ४.३० या वेळात संपन्न होणार आहे.

सदर परीक्षेकरिता केंद्र निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च, बडनेरा, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती, पी.आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अमरावती, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ इन्स्टिट्युट अन्ड रिसर्च, अमरावती, सेंटर फॉर इंडक्शन इंटर्नशिप इन्क्युबेशन ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट एच.व्ही.पी.एम., अमरावती, डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन एच.व्ही.पी.एम., अमरावती, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोला, श्री संत गजानन महाराज महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शेगांव, माऊली गृप ऑफ इन्स्टिट्युट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, शेगांव, आबासाहेब पारवेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ, पंकज लध्दड इन्स्टिट्युट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बुलढाणा या १२ परीक्षा केंद्रांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना सूचना की, आवेदन पत्र भरते वेळी त्यांनी जो ईमेल आय.डी. दिलेला होता, त्यावर विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र पाठविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या एक तास अगोदर उपस्थित रहावयाचे आहे. परीक्षार्थींनी प्रवेश पत्रासोबत ओळखपत्र (आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायन्सस, पॅन कार्ड व वोटर आय.डी.) सोबत ठेवणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक गॅझेटचा वापर करता येणार नाही.

परीक्षेसंदर्भातील माहितीपुस्तिका (मॅन्युअल) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सदर सर्व माहिती विद्यार्थ्यांना त्यांच्या ईमेल आय.डी. वर देण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

## एम.पेट परीक्षेबाबत कुलगुरू व परीक्षा संचालकांचा परीक्षार्थ्यांशी ऑनलाईन संवाद

एम.पेट २०२१ परीक्षेचे नियोजन व परीक्षेबाबत मार्गदर्शन यावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे व परीक्षा व मूल्यमापन मंडळांचे संचालक डॉ. हेमंत देशमुख युट्युबवर परीक्षार्थ्यांशी लाईव्ह संवाद साधणार आहे. दि. २७ व २८ नोव्हेंबर, २०२१ रोजी एम.पेट ची परीक्षा होणार असून या परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी दि. २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता युट्युबवर लाईव्ह प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. युट्युबची लिंक https://youtu.be/9XUMJgjWjp0 ही आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २३/११/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी